# शाश्वत विकास ध्येयांच्या (SDGs) नऊ संकल्पना/विषय (थिम्स)

सयुक्त राष्ट्र संघाने शाश्वत विकासाच्या उद्देशाने जाहीर केलेल्या ‘जागतिक कार्यक्रम २०३०’ मध्ये १७ शाश्वत विकासाची ध्येये व त्या अंतर्गत १६९ साध्ये यांचा समावेश असून हा कार्यक्रम १ जानेवारी २०१६ पासून लागू झाला आहे.

‘सर्वांना सोबत घेऊन चला’ (Leave no one behind) हा या जागतिक कार्यक्रमाचा गाभा आहे.

जागतिक कार्यक्रम-२०३० ची देशात प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी भारत सरकार कटीबध्द आहे. भारताची राष्ट्रीय विकास ध्येये व ‘सर्वांची योजना सर्वांचा विकास’ किंवा ‘सर्वांसोबत आणि सर्वांसाठी विकास’ ही धोरणे शाश्वत विकासाची ध्येये साध्य करण्यासाठी अनुरूप अशीच आहेत. विविध संस्था, संघटना, खाजगी क्षेत्रे, तरूण, समुदाय आणि घटकांशी समन्वयातून ही शाश्वत विकासाची ध्येये साध्य करणे निश्चितच शक्य होणार आहे.

भारत सरकारच्या पंचायती राज विभागाने तयार केलेल्या तज्ञ गटाने पंचायत राज संस्थांमध्ये ही ध्येये साध्य करण्यासाठी संकल्पनात्मक दृष्टीकोणाचा अंगीकार करणेबाबत सूचित केले असून यासाठी ९ संकल्पना / विषय निश्चित करुन दिले आहेत. या संकल्पना खालील प्रमाणे :-




**शाश्वत विकासाच्या या नऊ संकल्पना/विषय खालील प्रमाणे आहेत.**

१) गरिबी मुक्त आणि उपजीविका (रोजगार) वृद्धीस पोषक गाव (Poverty free and enhanced livelihoods Village)

२)आरोग्यदायी गाव (Healthy Village)

३) बालस्नेही गाव (Child-friendly Village)

४) जल समृद्ध गाव (water sufficient Village)
५) स्वच्छ आणि हरित गाव (Clean and Green Village)
६) स्वयंपूर्ण पायाभूत सुविधायुक्त गाव (Self-sufficient infrastructure in Village)
७) सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव (Socially Secured Village)
८) सुशासन युक्त गाव (Village with Good Governance)
९) लिंग समभाव पोषक गाव (Engendered Development in Village)
या संकल्पनांच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकार पंचायत राज व्यवस्थेमध्ये शाश्वत विकासाची ध्येये साध्य करण्याच्या दिशेने मार्गक्रमण करीत आहे.

या नऊ विकास संकल्पना/विषयांमध्ये आवश्यक असणारी स्थानिक ध्येये काय असावीत यासाठी शासनाने निश्चित केलेले विकास योजनांशी संबंधित उपक्रम याबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

## १) गरिबी मुक्त आणि उपजीविका (रोजगार) वृद्धीस पोषक गाव (Poverty free and enhanced livelihoods Village)

**अशा गावासाठी व्हिजन-** गरिबी मुक्त गाव म्हणजे असं गाव, ज्या गावात सर्व समाज घटकांची भरभराट आणि वाढ होण्यासाठी आवश्यक उपजिविका विकासाची पुरेशी साधने उपलब्ध असतील. असं गाव ज्या गावात कुणीही मागे राहणार नाही यासाठी सर्व समाज घटकांना सामाजिक सुरक्षा उपलब्ध असेल.

गरिबीला अनेक अंगे असतात. त्यात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, लिंगभाव आणि अन्य सामाजिक क्षेत्रातही संधी पासून वंचित राहिल्याने व त्यातून असमानता निर्माण होत असल्याने समाजातील अनेक घटकांना गरिबीचा प्रश्न भेडसावत असतो.

| स्थानिक ध्येये | स्थानिक कार्यवाहीचे मुद्दे |
|---|---|
| १. उपजीविका आणि सामाजिक संरक्षण देणा-या योजनांमध्ये सर्व पात्र लाभार्थी घटकांना सामावून घेणे. उदा. सार्वजनिक वितरण प्रणाली (PDS) आणि एकात्मिक बाल विकास सेवा (ICDS) या सारख्या योजनांचा लाभ अधिकाधिक लोकांना मिळवून देणे.<br><br>२. वैयक्तिक आणि सामुहिक उपक्रमांद्वारे आर्थिक विकास आणि रोजगार निर्मिती करणे.<br>३. शाळेत जाण्याच्या वयात 100 टक्के मुलांची शाळेमध्ये नोंदणी करणे व विदयार्थी : शिक्षक प्रमाणामध्ये समतोल ठेवणे. | • मिशन अंत्योदय (MA) सर्व्हेक्षण आणि सामाजिक व आर्थिक जात गणना (SECC) च्या माहितीद्वारे बहु वंचित लोकांची यादी निश्चित करणे.<br>• रोजगार पत्रांचे (Job Card) परिणामकारक वितरण करणे व ते गरजू लोकांना मिळवून देणे.<br>• सार्वजनिक वितरण प्रणालीवर नोंदी घेण्यासाठी लोकांना आवश्यक सहकार्य करणे.<br>• कौशल्य विकास प्रशिक्षण, उद्योग व्यवसाय उपक्रम आणि रोजगार निर्मितीद्वारे उत्पन्न वाढ करणे.<br>• सिंचन व उत्पादकतेत वाढ करणे, दर्जेदार बियाणे, जैविक खते, नवीन माहिती तंत्रज्ञानाची ओळख करुन त्याचा अंगिकार करुन व कृषि विज्ञान केंद्रांचा लाभ घेऊन आपल्या शेत जमिनीची उत्पादकता वाढविणे.<br>• स्वयं सहय्यता गटांना प्रशिक्षणाद्वारे सक्षम करणे, त्यांना बचतीच्या उपक्रमांमध्ये सहभागी करुन घेणे, गटांना बँकांकडून कर्ज उपलब्ध करून देणे.<br>• ग्रामपंचायत विकास आराखडा निधी आणि इतर कार्यक्रमांचे अभिसरण करणेकामी नियोजन करणे. |

## २) आरोग्यदायी गाव (Healthy Village)

**अशा गावासाठी व्हिजन-** असे गाव ज्या गावात सर्व वयोगटांच्या महिला पुरुषांचे आरोग्य आणि खुशालीची खात्री असेल.

गावातील सर्व समाज घटकांना पुरेशे अन्न मिळेल आणि गावातील कुपोषण नाहीसे होईल यासाठी शाश्वत आणि एकात्मिक शेतीला प्रोत्साहन देणे; बालके, किशोर वयीन मुले-मुली, महिला आणि जेष्ठ नागरिक यांच्या आहारातील पोषणमूल्ये वाढविणे आणि त्यांच्यासाठी सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवांची उपब्धता असणे.

| स्थानिक ध्येये | स्थानिक कार्यवाहीचे मुद्दे |
|---|---|
| १. बालकांमधील बुटकेपणा (वयाप्रमाणे उंची नसणे) आणि लुकडेपणा (उंची प्रमाणे वजन नसणे) चे उच्चाटन करणे.<br>२. महिला आणि किशोर वयीन मुलींमधील रक्तक्षय/रक्ताल्पतेचे (अनेमिया) उच्चाटन करणे.<br>३. कमी किमतीचे /किफायतशीर, अधिक पोषणमूल्य असलेले आणि स्थानिक पातळीवर विकत घेतलेली कडधान्ये/ तृणधान्ये, पालेभाज्या, फळे, अंडी इत्यादींची उपलब्धता करणे.<br>४. संसर्गजन्य आजारांसाठी प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक उपाययोजना करणे.<br>५. पाच वर्षाखालील बालकांच्या मृत्युचे आणि माता मृत्यूचे प्रमाण शून्य करणे.<br>६. सर्वांसाठी वैद्यकीय चिकित्सा आणि आरोग्य सुविधांची तरतूद करणे.<br>७. मिश्र शेती आणि बहुपीक पद्धतीचा अवलंब करून शेती क्षेत्रात वैविध्यपूर्णता आणणे.<br>८. सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देणे. | • **नोंद घेणे (Enroll)-**<br>➢ सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत कुटुंबांची नोंदणी करणे.<br>➢ एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत बालके, गरोदर माता आणि किशोरवयीन मुलींची नोंदणी करणे.<br>• **खात्री करणे (Insure)-**<br>➢ ६ वर्षाखालील बालकांच्या वाढीचे संनियंत्रण करणे.<br>➢ गरोदर आणि स्तनपान करणा-या/स्तनदा महिला, किशोरवयीन मुली यांचा एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या पूरक पोषण आहार कार्यक्रमांतर्गत सामावेश करणे.<br>➢ शालेय मुलांना दर्जेदार आणि पोषणमूल्य असलेल्या मध्यान्ह भोजनाचा पुरवठा.<br>➢ शाळांमध्ये पोषण बाग (Nutri-Garden).<br>➢ प्राथमिक आरोग्य सेवा केंद्र (PHSC) आणि समुदाय आरोग्य केंद्र (CHC), दुरस्थ औषधोपचार सल्ला (Telemedicine) सुविधेला प्रोत्साहन देणे.<br>• **संनियंत्रण करणे (Monitor)-**<br>➢ मलेरिया, जलजन्य आजार आणि अन्य संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी स्वच्छता. |

## ३) बालस्नेही गाव (Child friendly Village)

**अशा गावासाठी व्हिजन-** गावातील सर्व मुलांना निर्धोक आणि सुरक्षित वातावरण तसेच चांगले गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आरोग्य सेवा उपलब्ध करणे.

| स्थानिक ध्येये | स्थानिक कार्यवाहीचे मुद्दे |
|---|---|
| १. १०० % बाल मजूर मुक्त गाव.<br>२. १००% मुलांची शाळेमध्ये नोंदणी | • **नियोजन आणि संनियंत्रण (Plan & Monitor)-**<br>➢ शाळांमध्ये दर्जेदार पायाभूत सुविधा व मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे. |

| | |
|---|---|
| करणे.<br><br>३. तस्करीच्या प्रकरणांना आळा.<br><br>४. बालविवाहाचे प्रमाण कमी करणे.<br><br>५. मुलांसोबत होणा-या सर्व प्रकारच्या हिंसाचाराचे प्रमाण कमी करण्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे.<br><br>६. स्थानिक स्वशासनात मुलांचा सहभाग असल्याची खात्री करणे.<br><br>७. निर्धोक, सुरक्षित आणि स्वच्छ वातावरणाची खात्री करणे. | ➢ गुणवत्तापूर्ण शिक्षण- मुलांची शाळागळती नसणे.<br>➢ क्रिडांगण आणि ग्रंथालय.<br>➢ कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम.<br>➢ बालसभा/ बालकांची संसद<br>• **खात्री करणे(Ensure)-**<br>➢ बाल विवाह आणि तस्करीची प्रकरणे नसणे.<br>➢ शालेय गणवेश, पाठ्यपुस्तके, शिष्यवृत्ती अनुदान हे विध्यार्थ्यांचे हक्क आहेत, ते वेळेत उपलब्ध करुन देणे.<br>• **प्रोत्साहन देणे (Promote)-**<br>➢ अमली पदार्थ आणि मादक द्रव्ये यांचे सेवन घातक असल्याने त्याबद्दल विध्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करणे.<br>➢ मुलांबाबतच्या कायदेशीर तरतुदींविषयी जागृती निर्माण करणे. |

### ४) जलसमृद्ध गाव (Water Sufficient Village)

**अशा गावासाठी व्हिजन-** गावातील सर्व घरांसाठी वैयक्तिक नळजोडणीद्वारे मापदंडानुसार गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार पाणी पुरवठा. उत्तम पाणी व्यवस्थापन, शेती आणि पाण्याच्या सर्व गरजा पूर्ण होतील इतकी पाण्याची उपलब्धता, पाण्याचा पुनर्वापर आणि जलपुनर्भरण.

| स्थानिक ध्येये | स्थानिक कार्यवाहीचे मुद्दे |
|---|---|
| १. सर्वांसाठी पुरेसे स्वच्छ पाणी आणि पिण्यायोग्य पाणी सुविधांची उपलब्धता.<br><br>२. गावात सर्वांसाठी स्वच्छता सुविधा.<br><br>३. घरगुती शौचालयांचा १००% वापर.<br><br>४. सांडपाणी प्रक्रिया आणि शुद्धीकरण यंत्रणा विकसित करणे.<br><br>५. १००% हागणदारी मुक्त गाव करणे.<br><br>६. भूजलसाठा कमी होणे, पाण्याचे आर्सेनिक प्रदुषण, पाउस पाणी संकलन, भूजल पुनर्भरण याकडे लक्ष देणे.<br><br>७. नैसर्गिक स्त्रोतांचे जतन व संवर्धन करून परिसंस्थेचे रक्षण करणे. | • **खात्री करणे (Ensure)-**<br>➢ सर्व घरांना नळाद्वारे सुरक्षित आणि पुरेशे पाणी पुरविणे.<br>➢ पाण्याचे प्रदूषण टाळणे.<br>➢ पावसाच्या पाण्याचे संकलन व पुनर्भरण करणे.<br>➢ कोरडवाहू शेतीसाठी जल संवर्धन.<br>➢ सांडपाण्याचा पुनर्वापर करणे.<br>• **नियोजन आणि संनियंत्रण (Plan & Monitoring)**<br>➢ जल साठ्यांच्या संवर्धनासाठी समुदाय संनियंत्रण.<br>➢ पाण्याची मागणी व उपलब्धता विचारात घेऊन पाणी उपशाचे संनियंत्रण करणे.<br>➢ पाणी वितरण जाळे.<br>➢ भूजल साठ्यांचे पुनर्भरण.<br>➢ पाझरांचे पुनरुज्जीवन करणे. (Rejuvenation of Springs)<br>• **सहाय्य करणे (Facilitate)-**<br>➢ सुयोग्य लघुसिंचन पद्धतींचा वापर (ड्रिप/स्प्रिंक्लर)<br>➢ पाण्याचा न्यायपूर्ण आणि शाश्वत वापर करुन योग्य पीक पद्धतींचा अवलंब करत पाणी वापर क्षमता विकसित करणे. यासाठी आपल्या आवर्षण प्रवण क्षेत्रातील पारंपारिक पाणीवापराच्या पद्धतींचा वापर करणे.<br>➢ जल चाचण्यांसाठी तंत्रज्ञानाचा वापर.<br>➢ कार्यक्षम पाणी वापर तंत्रज्ञानावर आधारित शेती. |

## ५) स्वच्छ आणि हरित गाव (Clean and Green Village)

**अशा गावासाठी व्हिजन-** बालकांच्या भविष्यासाठी बालस्नेही गाव तयार करणे. निसर्गसंपन्न हरित गाव निर्माण करणे, अपारंपारिक उर्जेचा वापर, स्वच्छता, पर्यावरणाशी अनुकूल व्यवहार आणि पर्यावरण रक्षण.

| स्थानिक ध्येये | स्थानिक कार्यवाहीचे मुद्दे |
|---|---|
| १. पारंपारिक उर्जे पासुन अपारंपारिक उर्जेकडे वळणे.<br>२. १०० % हागणदारी मुक्त गाव<br>३. स्थानिक रोपवाटिकांचा वापर करुन सामाजिक वनीकरणाद्वारे हरित क्षेत्रात वाढ करणे.<br>४. जैव विविधतेचे संवर्धन व परिसंस्थेची शाश्वतता जतन करणे. | • **खात्री करणे(Ensure)-**<br>➢ सार्वजनिक आणि वैयक्तिक ठिकाणी सौर उर्जेचा वापर.<br>➢ सक्षम वीज वितरण यंत्रणा.<br>➢ सक्षम घनकचरा व्यवस्थापन सुविधा.<br>• **प्रोत्साहन देणे (Promote)-**<br>➢ बायो-गॅस प्रणालीचे बांधकाम आणि त्याचा वापर.<br>➢ स्थानिक जलविद्युत स्त्रोतांचा वापर करणे.<br>➢ सुक्ष्म सिंचनासाठी उर्जा कार्यक्षम सोलर पंपांचा वापर करणे.<br>➢ गावातील उपवने/देवराई/वनराई/, जल साठे, वने यासारख्या नैसर्गिक संसाधनांचे समुदायाधारित व्यवस्थापन करणे.<br>➢ तीव्र डोंगर उतार, पडीक व इतर सार्वजनिक जमिनी आणि रस्त्यांच्या दुतर्फा नैसर्गिक वनस्पतींची लागवड करणे.<br>➢ सार्वजनिक जैवविविधता नोंदवही अद्ययावत ठेवणे.<br>➢ वृक्षारोपन कार्यक्रम आणि रोप वाटिका, खत निर्मिती प्रकल्प. |

## ६) स्वयंपूर्ण पायाभूत सुविधायुक्त गाव (Self-sufficient infrastructure in Village)

**अशा गावासाठी व्हिजन-** पायाभूत सुविधांच्या दृष्टीने गाव स्वयंपूर्ण करणे, गावातील सर्वांना परवडणारी घरे, निर्धोक आणि पुरेशा प्राथमिक सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे.

| स्थानिक ध्येये | स्थानिक कार्यवाहीचे मुद्दे |
|---|---|
| १. गावात ग्रामपंचायत भवन, अंगणवाडी केंद्र, शाळा, आरोग्य केंद्र, नागरी सुविधा केंद्र, शाळांमध्ये मुलां-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह (पाण्याच्या उपलब्धतेसह) यांसारख्या दर्जेदार पायाभूत सुविधांची उभारणी करणे.<br>२. बारमाही वापरायोग्य रस्ते, सौर पथ दिवे, सामुदायिक सोलर ट्री, गावातील सर्वांना पक्की घरे.<br>३. सर्व घरांना वैयक्तिक नळजोडणीद्वारे पाणी पुरवठा.<br>४. बंदिस्त गटर प्रणालीचा वापर. | • **पक्क्या घरांची उपलब्धता**<br>• अंगणवाडी व शाळांमध्ये (मुलां-मुलींसाठी स्वतंत्र) पुरेशी व कार्यरत स्वच्छतागृहे (पाण्याच्या उपलब्धतेसह)<br>• बंद नाली बांधकामाद्वारे सांडपाणी व्यवस्थापनासाठी सक्षम व्यवस्था.<br>• पिण्याचे पाणी आणि आवश्यक स्वच्छता सुविधांनी युक्त ग्रामपंचायत इमारत.<br>• तांत्रिक सोयीसुविधांनीयुक्त नागरी सुविधा केंद्र.<br>• प्राथमिक आरोग्य सेवा केंद्र/ समुदाय आरोग्य केंद्र व शाळांमध्ये चांगल्या पायाभूत सुविधा.<br>• सामाजिक सभागृह, डिजिटल सार्वजनिक ग्रंथालय आणि क्रिडांगणे. |

### ७) सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव (Socially-Secured Village)

**अशा गावासाठी व्हिजन-** गावात प्रत्येक व्यक्तीची काळजी घेतली जाते याची भावना गावक-यांमध्ये निर्माण करणे. गावातील सर्व पात्र नागरिकांना सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळवून देणे.

गावातील गरिब व असुरक्षित नागरिकांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सामाजिक संरक्षण यंत्रणा निर्माण करणे जेणेकरून सर्वांना गावाच्या विकासामध्ये सोबत घेऊन जाणे शक्य होईल.

| स्थानिक ध्येये | स्थानिक कार्यवाहीचे मुद्दे |
|---|---|
| १. दारिद्य रेषेखालील कुटुंबांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे.<br>२. गावातील सर्व नागरिकांना सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळवून देणे.<br>३.एकात्मिक बाल विकास सेवा (ICDS) योजनेंतर्गत गरोदर महिला आणि बालकांची नोंदणी करण्यासाठी सहाय्य करणे.<br>४. मनरेगा (MGNREGS)अंतर्गत रोजगार निर्मीती करुन गरिबी निर्मूलनासाठी प्रयत्न करणे.<br>५. दिव्यांग व्यक्तींसाठी योग्य अशा सोयी-सुविधांची (दिव्यांग स्नेही) उपलब्धता करणे. | • जबाबदार, सर्वसमावेशक, लोकसहभागीय आणि प्रातिनिधीक निर्णय प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी ग्रामसभा सक्षम करणे.<br>• सामाजिक आर्थिक जात गणने (SECC) द्वारे प्राप्त माहिती आधारे बहुवंचित गरिब व्यक्तींचा शोध घेणे.<br>• ग्रामपंचायतीला सहाय्यक ठरतील अशा विविध सामाजिक संघटना व संस्थांचे कार्यक्रम आणि योजनांचे अभिसरण करणे.<br>• सार्वजनिक वितरण प्रणाली (PDS) अंतर्गत लोकांची नोंदणी करणेस सहकार्य करणे |

### ८) सुशासन युक्त गाव (Village with Good Governance)

**अशा गावासाठी व्हिजन-** सुशासनाद्वारे गावातील सर्व लोकांना विविध विकास योजनांचा लाभ व जबाबदार सेवा वितरणाची हमी देणे.

विकासाची ध्येये साध्य करण्यासाठी तसेच गावामध्ये सुधारणा विषयक कार्यक्रम राबविणेच्या दृष्टीने पारदर्शकता हा महत्वाचा घटक आहे.

| स्थानिक ध्येये | स्थानिक कार्यवाहीचे मुद्दे |
|---|---|
| १. ग्रामपंचायत विकास आराखडे (GPDP) तयार करताना विविध संस्था आणि लाभधारकांच्यात समन्वय आणि अभिसरण.<br>२. गावामध्ये भागीदारी व समन्वयाच्या भावनेचा विस्तार करणे.<br>३. शाश्वत विकासाच्या ध्येयांचे (SDGs) स्थानिकीकरण करण्यासाठी गावातील तरूण, मुले-मुली, स्वयं-सहाय्यता गट (SHGs), गाव समित्या यांना सहभागी करुन घेणे. | • सर्वसमावेशक ग्राम पंचायत विकास आराखडे (GPDP) तयार करणे.<br>• ग्रामपंचायतीमध्ये दर्शनी भागात माहितीचे फलक लावणे.<br>• केंद्र-राज्य शासनाच्या विविध विकास योजनांबाबत गावात जागरूकता निर्माण करणे.<br>• माहिती अधिकारात (RTI) प्राप्त प्रकरणांचा वेळेत निपटारा करणे.<br>• समाजातील असुरक्षित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा शोध घेणे.<br>• लोकांसाठी उत्तरदायी, सर्वसमावेशक, लोकसहभागीय आणि |

| | |
|---|---|
| ४. तंत्रज्ञानाचा वापर करुन लोकाभिमुख सेवा वितरण प्रणाली निर्माण करणे. | गाव विकासाच्या सर्व स्तरावरील निर्णय प्रक्रियेत लोकांचा प्रातिनिधीक सहभाग राहील यासाठी ग्रामसभेचे सक्षमीकरण करणे.<br>• माहिती तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे प्रभावीपणे सेवा प्रदान करणे.<br>• ग्रामीण क्षेत्रातील सर्वांगिण विकासाकरिता स्थानिक समित्यांचे सक्षमीकरण करणे. |

## ९) लिंग समभाव पोषक गाव (Engendered Development in Village)

**अशा गावासाठी व्हिजन-** गावात लिंगसमभाव स्थापन करण्यासाठी महिलांना समान संधी उपलब्ध करुन देणे.महिलांचे सक्षमीकरण करणे आणि मुलींना सुरक्षित वातावरण उपलब्ध करुन देणे.

भारतीय संविधानाच्या १४ व्या कलमान्वये देशातील सर्व नागरिकांना कायद्यापुढे समानता प्रदान करणेत आली असून धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थानाच्या आधारे भेदभाव करणेस मनाई करण्यात आली आहे. लिंगसमभाव, समानता, महिलांच्या हक्कांचे रक्षण व त्यांचा सहभाग याशिवाय सामाजिक व आर्थिक विकासातील विषमता नष्ट करणे अशक्य आहे.

| **स्थानिक ध्येये** | **स्थानिक कार्यवाहीचे मुद्दे** |
|---|---|
| १. महिला आणि मुलींविरुद्ध होणारे गुन्हे कमी करणे.<br><br>२. सार्वजनिक आणि खाजगी ठिकाणी महिलांसाठी सुरक्षेची हमी घेणे.<br><br>३. सामाजिक-राजकीय, आर्थिक उपक्रमांतील महिलांचा सहभाग वाढविण्यासोबतच गावातील विविध सामाजिक संघटनांमध्ये (CBOs) महिलांचा सहभाग वृद्धींगत करणे<br>४. महिलांना समान कामासाठी समान मजुरी उपलब्ध करुन देणे. | • **स्थानिक कृतीकार्यक्रमाचे मुद्दे-(Local Action Points):**<br>➢ १००% मुलींची शाळांमध्ये नोंदणी आणि त्यांचे शाळागळतीचे प्रमाण रोखणे.<br>➢ सायबर गुन्हे आणि व्यसन/ अंमली पदार्थांचे सेवन, या विरोधात विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करणे.<br>➢ महिला सभांचे नियमित आयोजन करणे.<br>➢ सामाजिक स्तरावर महिला आणि मुलींच्या विरोधात घडणा-या हिंसा, लैंगिक भेदभाव (Gender Disparity) यासारख्या मुद्द्यांवर चर्चा करणे.<br>➢ लिंगसमभावास पूरक अर्थसंकल्प तयार करणे.<br>➢ गरजू महिलांना मोफत कायदेविषयक सल्ला आणि सुरक्षा सेवा उपलब्ध करुन देणे.<br>➢ स्वयंसहय्यता गटांमार्फ़त आर्थिक उपक्रमांमध्ये महिलांचा सहभाग.<br>• **जागरूकता निर्माण करणे-(Promote Awareness on):**<br>➢ महिलांबाबतच्या कायदेविषयक तरतुदी<br><br>➢ बाल विवाह थांबविणे आणि बालविवाहामुळे शारिरिक व मानसिक आरोग्यावर होणारे दुष्परिणाम याबाबत जागृती निर्माण करणे.<br><br>➢ बाल तस्करीला नकार. आपल्या गावात असे प्रकार होणार नाहीत अशी सामाजिक सुरक्षा व्यवस्था करणे. |

| | |
|---|---|
| | ➢ लिंग परिक्षण, लिंग निवडीवरून गर्भपात करणे यांसारख्या लिंगभेद करणा-या प्रथांबाबत जागरूकता निर्माण करणे.<br>• **खात्री करणे (Ensure):**<br>➢ किशोरवयीन मुलींचा उपजीविका आणि कौशल्य विकास कार्यक्रमात सक्रिय सहभाग आणि समावेशन.<br>➢ महिला-मुलींच्या स्थलांतरावर लक्ष ठेवणे व त्याबाबतच्या नोंदी ठेवणे. |

**शाश्वत विकासाच्या संकल्पनांवर (थीम्स) काम करण्यासाठी सहाय्यभूत ठरणारी संसाधने म्हणून खालील कार्यक्रमांचा उपयोग ग्रामपंचायतीना करता येईल:-**

दीनदयाळ अंत्योदय योजना- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवन्नोन्नती अभियान-(उमेद) (DAY-MSRLM), राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM), महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS), दीन दयाळ उपाध्याय- ग्रामीण कौशल्य विकास योजना (DDU-GKY), **राष्ट्रीय सामाजिक सहायता कार्यक्रम (NSAP)**, प्रधान मंत्री आवास योजना (PMAY), सार्वजनिक वितरण प्रणाली (PDS), राष्ट्रीय स्वास्थ्य बीमा योजना (RSBY), स्वच्छ भारत मिशन (SBM-Grameen), मध्यान्ह भोजन (MDM), समग्र शिक्षा अभियान (SSA), दीन दयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना (DDYGKY), जननी सुरक्षा योजना (JSY), एकात्मिक बाल विकास योजना (ICDS), नारी, शिशु सुरक्षा कार्यक्रम, राष्ट्रीय स्वास्थ्य बीमा योजना(RSBY), राष्ट्रीय मृद आणि कृषी अभियान (NMSA) राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY), प्रधान मंत्री कृषी सिंचाई योजना (PMKSY), पोषण अभियान, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम(IWMP), **ग्रीन इंडिया मिशन, सामाजिक वनीकरण कार्यक्रम,** हरित भारत अभियान, सामाजिक वनीकरण योजना, जल जीवन मिशन, आणि केंद्र व राज्य शासनाच्या ग्राम विकास मंत्रालय, स्वच्छता आणि पेय जल मंत्रालय, शिक्षण मंत्रालय, ग्राहक उपभोक्ता मंत्रालय, अन्न आणि पुरवठा मंत्रालय या विभागांकडील अन्य विविध योजनांच्या अभिसरणातून गावाला आवश्यक संसाधनांची उपलब्धता करुन घेता येईल.

**गावाला मदत करू शकणारे घटक-** स्थायी समिती, कार्य गट/कार्यकारी समिती, स्वयं सहय्यता समूह, विविध विभागांचे आघाडीवर काम करणारे फ्रंट लाईन वर्कर्स, समुदाय संसाधन व्यक्ती, सामाजिक संघटना (CBOs), स्थानिक युवक आणि स्वयंसेवक, डॉक्टर्स, स्थानिक तज्ञ, कृषीशी संबंधित यंत्रणा, कृषी आणि फलोत्पादन यंत्रणा, पानलोट विकास चमू (प्रधान मंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत-PMKSY- पानलोट उपक्रम), दुग्धविकास आणि पशुधन व्यावसायिक, पालक शिक्षक संघटना-PTA/शालेय व्यवस्थापन समिती (SMC), ग्रामस्तरीय बाल संरक्षण समिती (VLCPC), पाणी पुरवठा योजना चालक, गवंडी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजने (MGNREGS) अंतर्गत नोंदणीकृत मजूर, स्वच्छता दूत, पारंपारिक शेतकरी आणि मजूर, कृषि विज्ञान केंद्र, महिला आणि बाल विकास (WCD) विभागाचे अधिकारी, पोलीस आणि कायदेविषयक सहाय्य, सामाजिक न्याय विभाग, पोलीस/गृह विभाग, वित्त विभाग, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग.

## I) संनियंत्रण यंत्रणा: संनियंत्रणाचे स्तर:

**नीती आयोग < विविध मंत्रालये < राज्ये < जिल्हे < तालुके < ग्रामपंचायत**

- **SDG डॅशबोर्ड- (शाश्वत विकासाची ध्येये डॅशबोर्ड)**

  १. गावातील वाडी वस्तीपर्यंतच्या सर्व ठिकाणांवर कामाचे फ़लक असावेत.

  २. राष्ट्रीय स्तरापासून राज्य, जिल्हा स्तरापर्यंत संबंधित विभागांच्या डॅशबोर्डचे एकात्मीकरण.

  ३.बेस्ट प्रॅक्टीसेसचे एकत्रीकरण/संकलन.

  ४. विभागनिहाय/प्रत्येक गावाचा एकात्मिक कृती आराखडा.

  ५.गावातील प्रत्येक घटकाची प्रगती होत असल्याचे संनियंत्रण.

- **बहुआयामी:**
  १. GIS सह सर्व माहितीचे आदानप्रदान
- **बहुस्तरीय:**
  १. पंचायत व्यवस्थेचे त्रिस्तर- GPDP ते BPDP ते DPDP.(ग्रामपंचाय विकास आराखडा ते पंचायत समिती विकास आराखडा ते जिल्हा परिषद विकास आराखडा)
  २. राज्य ग्रामीण विकास संस्था आणि राज्य शासनाच्या विभागाची माहिती.
- **रिपोर्ट कार्ड आणि सेल्फ असेसमेंट:**
- **फलनिष्पत्ती:**
  १. पंचायत डेव्हलपमेंट इंडेक्स (पंचायत विकास निर्देशांक)
  २. शाश्वत विकास ध्येये साध्य करण्यात केलेली प्रगती
  ३. थेमॅटीक प्रगती
  ४. विशेष पुढाकार (स्पेशल इनिशिएटिव्ह)
  ५. उत्कृष्ट/आदर्श यशोगाथा आणि त्यांचे दस्तऐवजीकरण

## II) प्रोत्साहन:

- **प्रोत्साहन क्षेत्रे-**
  - स्टार रेटिंग आणि नवरत्न – नऊ विषय (थिम्स)
  - पंचायत डेव्हलपमेंट इंडेक्स
  - SDG साध्य
  - शाश्वत विकास विषय/थीम आणि विविध मंत्रालय विभाग यांचा संबंध
    - महिला व बाल विकास विभाग + मानव संसाधन विकास विभाग - बाल स्नेही थीम
    - ग्राम विकास विभाग + महिला व बाल विकास विभाग – लिंग समभाव पोषक गाव थीम

- आरोग्य विभाग + महिला व बाल विकास विभाग – आरोग्यदायी गाव थीम
- जल शक्ती विभाग - जलसमृद्ध गाव थीम
- पर्यावरण आणि वन विभाग + जलशक्ती विभाग - स्वच्छ आणि हरित गाव
- पंचायती राज मंत्रालय- सुशासन थीम

- **विशेष पुढाकार.**

- CSR आणि सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून वस्तू व सेवा स्वरूपात मदत घेणे.
- बिगर आर्थिक, मिडिया, कार्यक्रम, साधन व्यक्ती, शाश्वत विकासाच्या ध्येयांमधील यंग चँपियन्स.
- SDG साठी चँपियन्स

**III) प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी-**

अ) प्रशिक्षणाच्या साखळी प्रकारातून बाहेर पडून बहुआयामी प्रशिक्षण देण्याकडे स्थित्यंतर.

ब) माहिती शिक्षण व संवाद/प्रशिक्षण/क्षमता बांधणी उपक्रमांसाठी सर्व संबंधित विभागांमध्ये समन्वय.

क) मागणी आधारित आणि गरजाभिमुख कार्यक्रम.

ड) सक्षमीकरणासाठी प्रशिक्षण -Train to Strength (Sector Enablers)

इ) विविध विकास योजनांचे नियोजन आणि कार्यान्वयन करताना योजनांचे अभिसरण करण्याकरिता नेमलेल्या विविध विभागांच्या कार्यकारी समित्यांच्या कामांमध्ये एकसंधता येण्यासाठी त्या समित्यांची क्षमता बांधणी करणे.

**IV) अभिसरण:**

अ) एकत्रित प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन-प्रशिक्षण- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवन्नोन्नती अभियान-(उमेद) MSRLM, स्वच्छ भारत मिशन, जल जीवन मिशन, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRLM-SBM-JJM-NRHM)

ब) विविध विभागांच्या उप योजनांचे GPDP आराखड्यात एकत्रीकरण:

i) सांसद आदर्श ग्राम योजना: ग्राम विकास आराखडा

ii) शिक्षण विभाग- शालेय विकास आराखडा

iii) जल जीवन मिशन- गाव कृती आराखडा (VAP)

iv) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवन्नोन्नती अभियान-
(उमेद) MSRLM, गाव गरिबी निर्मूलन आराखडा (VPRP)

v) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS): लेबर बजेट कृतीआराखडा

क) IEC चे अभिसरण- विविध योजनांच्या तरतुदीतून (Share of Scheme Outlay)

ड) पंचायत राज संस्था आणि स्वयं सहय्यता गट अभिसरण (PRI-SHG Convergence)

इ) कार्यकारी समूह/समित्या यांचे एकत्रीकरण: (उदा. ग्रामपंचायत नियोजन सहाय्य गट- Gram Panchayat Planning Facilitation Team-GPPFT, ग्राम स्तरीय बाल संरक्षण समिती, ग्राम आरोग्य आणि स्वच्छता समिती, ग्रामीण पाणी पुरवठा आणि स्वच्छता समिती, अंगणवाडी संनियंत्रण समिती, जैवविविधता व्यवस्थापन समिती, आपत्ती व्यवस्थापन समिती, पाणी आणि स्वच्छता समिती (WATSAN) सामाजिक लेखा परिक्षण, इत्यादी.